RNI No. MAHBIL /2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

वर्ष २, अंक १५] सोमवार, एप्रिल ११, २०१६/चैत्र २२, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २४**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई, दिनांक ७ एप्रिल २०१६.

**अधिसूचना**

क्रमांक १/ड-९/२०१६.—महाराष्ट्र विधानसभा नियमातील पुढील सुधारणा उक्त नियमातील नियम २२५ च्या पोट-नियम (३) ला अनुसरून, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

**महाराष्ट्र विधानसभा नियमांना सुधारणा**

**नियम ४ (२)**

१. नियम ४ (२) मधील (अ), (ब) व (क) ऐवजी पुढीलप्रमाणे मजकूर दाखल करण्यात यावा - "अध्यक्षांनी अन्यथा निदेश दिलेला नसेल तर, सभागृहाच्या बैठकी, सामान्यपणे, सोमवार ते शुक्रवार या दिवशी ११.०० वाजता सुरू होऊन १८.०० वाजता समाप्त होतील."

**नियम ७२ (२)**

२. नियम ७२ (२) मध्ये "परंतु आणखी असे की, मा.अध्यक्षांना सभागृहाचे अधिवेशन चालू नसेल तेव्हा अतारांकित प्रश्नांची उत्तरे विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आली नसली तरी ती छापण्याचा, प्रसिध्द करण्याचा, प्रसृत करण्याचा तसेच सदस्यांना ४० दिवसांच्या आत वितरित करण्याचा आदेश देता येईल. त्याबाबतीत सभागृहाच्या पुढच्या अधिवेशनात पहिल्या आठवड्यात सोईस्कर वेळी अशी अतारांकित प्रश्नांची उत्तरं पटलावर ठेवण्यात येतील."

नियम २४४

३. नियम २४४-त नंतर पुढील प्रमाणे नवीन नियम दाखल करण्यात येतील :—

"(व्ही) मराठी भाषा समिती"

**मराठी भाषा समितीची रचना.**

२४४-थ (१) विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनानंतर किंवा यथास्थिती, नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, मराठी भाषा समितीची रचना करण्यात येईल.

(२) या समितीमध्ये सदस्यांची एकुण संख्या पंधरा असावी. यापैकी अकरा सदस्य विधानसभेच्या सदस्यांमधून अध्यक्षांद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील आणि त्याच रितीने चार सदस्य विधानपरिषदेच्या सदस्यांमधून, सभापतींद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील.

(३) समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

**समितीची कार्ये.**

२४४-द (१) कार्यालयीन कामकाजांमध्ये मराठी भाषेच्या वापराबाबत आढावा घेऊन राज्य शासनाला सूचना देणे व उपाययोजना सूचविणे.

(२) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये "मराठी" ही शासन व्यवहारासाठी राजभाषा म्हणून स्वीकारण्यात आली आहे. सर्व क्षेत्रात मराठी भाषेचा वापर करण्याच्या दृष्टीने मराठीच्या वापराचा आढावा घेणेसाठी राज्यातील राज्य शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेच्या वापरासंदर्भात आढावा घेऊन त्याबाबत राज्यशासनाला सूचना देणे व उपाययोजना सूचविणे.

(३) इतर बाबतीत या सभागृहाच्या समितीसंबंधीत कार्यपध्दतीच्या नियमांत अध्यक्ष जे बदल किंवा फेरफार करतील त्यांनाही ते नियम लागू होतील.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.